भिवंडी वाहतूक उपविभाग हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ११० /२०२६ दि. २६/०५/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, भिवंडी वाहतूक उपविभागाचे हद्दीत दि.२७/०५/२०२५ रोजी **' बकरी ईद ' एक दिवस मागे किंवा पुढे चंद्र दर्शनानुसार** साजरा करण्यात येणार आहे. सदर दिवशी मुस्लिम बांधव मोठया प्रमाणात पहाटे पासुनच नमाज पडणेसाठी वेगवेगळया मशिदीमध्ये मोठया संख्येने जमा होतात. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी मी **पंकज शिरसाठ, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे.

प्रवेश बंद –	**१)** मुंबई/ठाणे/मानकोली कडून जुना ठाणे आग्रा रोडने भिवंडी शहराकडे येणाऱ्या सर्व जड/अवजड वाहनांना **अंजुरफाटा** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदर वाहने वसई रोड कडून कारीवली जकातनाका व विटभटटी मार्गे इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**२)** मुंबई ठाणे कडून जुना ठाणे आग्रा रोडने अंजुरफाटया कडून भिवंडी शहरात येणाऱ्या एस.टी./टी.एम.टी. सर्व प्रकारच्या बसेस व हलक्या वाहनांना **नारपोली पो. स्टे.** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	एस.टी./टी.एम.टी. बसेस नारपोली पो.स्टे. येथे प्रवासी उतरवतील व तेथूनच प्रवासी घेवून परत जातील. तसेच हलकी वाहने देवजीनगर अथवा साईनाथ सोसायटी, कामतघर रोडने इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**३) अ)** रांजनोली नाका कडून भिवंडी शहरात येणा–या सर्व प्रकारच्या जड व मध्यम, हलक्या वाहनांना (कार, रिक्षा, दुचाकी वाहने) **रांजनोली नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. **ब)** एस.टी./के.डी.एम.टी./टी.एम.टी. बसेस यांना **रांजनोली नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	**अ)** सदर जड–अवजड, मध्यम व हलकी वाहने रांजनोली नाका येथून वळसा घेवून मुंबई नाशिक बायपास हायवे वरील मानकोली नाका येथून अंजुरफाटा किंवा वसई रोडने किंवा ओवळी खिंड येथून ओवळी गांव, ताडाळी जकातनाका, पाईपलाईन रोडने इच्छित स्थळी जातील. **ब)** एस.टी./के.डी.एम.टी./टी.एम.टी. बसेस रांजनोली नाका येथे प्रवासी उतरवतील व तेथून प्रवासी भरुन इच्छित स्थळी जातील. तसेच इतर वाहने रांजनोली नाका येथून वळसा घेवून परत जातील.
प्रवेश बंद –	**४)** वाडा रोडने नदीनाका मार्गे भिवंडी शहराकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना **पारोळफाटा (नदीनाका)** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदर वाहने अंबाडी नाका येथून राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ ने अथवा बृहन्मुंबई महानगरपालिका पाईपलाईने इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**५)** वाडा रोडने नदीनाका मार्गे भिवंडी शहराकडे येणाऱ्या सर्व हलक्या वाहनांना **मेट्रो हॉटेल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची हलकी वाहने ही मेट्रो हॉटेल येथून उजवीकडे वळून संगमपाडा रोड – अजयनगर पर्यंत येवून इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**६)** वडपा चेकपोस्ट मार्गे भिवंडी शहराकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना एस.टी. बससेसह **धामणगांव जांबोळी पाईपलाईन नाका व चाविंद्रा नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग –	**अ)** सदर सर्व प्रकारची वाहने धामणगांव पाईपलाईन येथे उजवीकडे **वळण** घेवून पाईपलाईन मार्गे वाडयाकडे व पुढे इच्छित स्थळी जातील. **ब)** तसेच एस.टी. बसेस आपले प्रवासी चाविंद्रा जकातनाका येथे प्रवासी उतरतील व तेथूनच प्रवासी घेवून परत जातील.
प्रवेश बंद –	**७)** छत्रपती शिवाजी महाराज चौक कडून वंजारपाटी नाका मार्गे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **छत्रपती शिवाजी महाराज चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदर वाहने अजयनगर – संगमपाडा – मेट्रो हॉटेल येथून डावीकडे वळून वंजारपाटी ब्रिज वरुन इच्छित स्थळी जातील.

: सदर अधिसूचना दि.२७/०५/२०२६ रोजी **'बकरी ईद' एक दिवस मागे किंवा पुढे चंद्र दर्शनानुसार** सकाळी ०६.०० ते १०.०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाठ)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण
मा. आयुक्त, निजापुरशहर महानगरपालिका, भिवंडी,/बृहन्मुंबई
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–२/वि.शा.ठाणे.

प्रत कार्यवाहीसाठी :–

प्रादेशिक परिवहन अधिकारी भिवंडी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, भिवंडी
विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, भिवंडी
नियंत्रण कक्ष अधिकारी, भिवंडी/ठाणे.

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, भिवंडी व पो.निरी. भिवंडी, नारपोली, कोनगांव वाहतूक उपविभाग, ठाणे शहर